दै. पुण्यनगरी दि. २१।१०।२०२४

# प्राण्यांची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर गुन्हे दाखल

## इतवारा, माहूर पोलिस ठाण्याकडून कारवाई

**नांदेड / प्रतिनिधी**

प्राण्यांस क्रुरतेने वागणूक देऊन विनापरवाना आणि बेकायदेशिररित्या गोवंशाची कत्तलीसाठी वाहतुक करणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. त्याचबरोबर याबाबत इतवारा आणि माहूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जुन्या नांदेड शहरातील इतवारा पोलिस ठाण्याच्या हद्दीत दि. १९ रोजी साडेसात वाजता पोलिसांनी देवी मंदिराचे पाठीमागे देगलुर नाका येथे एक वाहन थांबवले. त्याची तपासणी केली असता तोफिकखान जफरखान (वय २०, रा. नवी आबादी, अर्धापूर) याने विनापरवाना व बेकायदेशिररीत्या गोवंश जातीचे आठ जनावरे यांना क्रूरतेने कोंबुन एक बोलोरो वाहनातून (क्रमांक एमएच २९ / बीइ ४२७९) एकूण चार लाख २० हजाराचा मुद्देमालासह वाहतुक करीत असताना मिळून आला. त्यामुळे याबाबत पोलिस जमादार मधुकर भिसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इतवारा पोलिस ठाण्यात प्राण्यांस निर्दयतेने वागण्यास प्रतिबंध कायदासह, मोटार वाहन कायदा आणि नियमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस नायक श्री दुरानी करीत आहेत.

दुसऱ्या घटनेत माहूर शहरातील रेणुका माता कॉलेज समोरील रस्त्यावर दि. १९ रोजी पावणेदहाच्या सुमारास आरोपी फिरोज पेरू खान (रा. दत्तनगर माहूर) याने विनापरवाना व बेकायदेशिररीत्या ४० हजाराचे गोवंश जातीचे दोन बैल घेऊन जाताना आढळून आला. पोलिसांनी त्याच्याकडे विचारपूस केली असता शेती नसताना तो समाधानकारक उत्तर न देता घेऊन जात असताना ताब्यात बाळगलेला मिळून आला. त्यामुळे याबाबत फौजदार पालसिंग भिकासिंग ब्राह्मण यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माहुर पोलिस ठाण्यात प्राण्यांस निर्दयतेने वागण्यास महाराष्ट्र प्राणी संरक्षण व प्राण्यांना कुरतेने वागणुक अधिनियम २०१५ कायदाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस जमादार श्री चौधरी करीत आहेत.

दै. सामना दि २१.१०.२०२४

# चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीस अखेर अटक

## १९ वर्षांपासून होता फरार

लोहा, दि. २० (सा.वा.) – लोहा पोलीस ठाणे हद्दीअंतर्गत सन २००५ मधील एका चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी मागील १९ वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देत होता. मात्र, गुप्त खबऱ्यामार्फत मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी सापळा रचून या आरोपीच्या मुसक्या आवळल्या. नूतन पोलीस अधिकारी नागनाथ आयलाने यांनी लोहा पोलीस ठाण्याची सूत्रे हाती घेताच उत्कृष्ट कामगिरी केल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

लोहा पोलीस ठाणे हद्दीत सन २००५ मध्ये पोलिसांत गुन्हा नोंद होता. गुन्ह्यातील आरोपी अर्जुन बिचवा काळे (५१, रा. सोनी जवळा, ता. केज, जि. बीड) याचा शोध पोलिसांकडून सुरूच होता. मात्र, आरोपी सातत्याने पोलिसांना गुंगारा देत होता.

नूतन पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांनी लोहा पोलीस ठाण्याची सूत्रे हाती घेताच त्यांनी फरार आरोपींचा शोध सुरू केला. मागील १९ वर्षांपासून फरार असलेला आरोपी अर्जुन काळे हा केज तालुक्यातील एका वस्तीवर असल्याची गुप्त माहिती लोहा पोलिसांना मिळाल्यावर पोलिसांनी सापळा रचून या आरोपीच्या मुसक्या आवळल्या. ही कारवाई पोलीस निरीक्षक आयलाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक तलवार यांच्या नेतृत्वाखाली सपोउपनि सैफ शेख, पोलीस कॉन्स्टेबल दत्तात्रय शेळके, पोलीस जमादार भुरे आदींच्या पोलीस पथकाने केली. या आरोपीस लोहा न्यायालयात हजर केले असता त्यास दि.२५ ऑक्टोबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली.